कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२४-२५/१२४३
दि. ०४/०९/२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

सामुहिकता ही गोव्याच्या संस्कृतीचे खास वैशिष्ठय आहे. आणि ती आज "अमृताभिषेक" या कार्यक्रमातून मला स्पष्टपणे दिसून आली. असे प्रतिपादन पद्‍मश्री श्री विनायक खेडेकर यांनी केले. कला अकादमी गोवाच्या भारतीय संगीत व नृत्य विभागाच्या वतीने आयोजित वार्षिक दिन सोहळयात सन्माननीय अतिथी या नात्याने ते बोलत होते. पं. जितेद्र अभिषेकी यांच्या वैविध्यपूर्ण रचनांचा कलात्मक आविष्कार "अमृताभिषेक" या कार्यक्रमात सादर करण्यात आला. गायन, वादन, नर्तन या तिन्हींचा संगम सदर कार्यक्रमात होता. प्रतिभावंत संगीतकार पं. जितेद्र अभिषेकी यांच्या विविध रचना, संगीत व नृत्य विभागातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या सादर करुन वाहवा मिळविली. “मला दिवा नीट दिसत नाही परंतु ज्योत स्पष्ट दिसत आहे.” आजच्या सादरीकरणात अशा अंसख्य लखलखणा-या ज्योती मला स्पष्टपणे रंगमंचावर दिसत होत्या असे म्हणून विद्यार्थ्यांचं श्री. खेडेकर यांनी कौतूक तर केलंच त्याचप्रमाणे "अमृताभिषेक" या कार्यक्रमाचे अनेक प्रयोग गोव्यात गोव्याबाहेर व्हायला पाहिजेत आणि त्यासाठी कला अकादमीने विशेष प्रयत्न केले पाहिजे असं ते म्हणाले. कार्यक्रमाची सुरुवात नमस्ते कलावंत गोमंतदेशा या श्लोकाने झाली. तद्‍नंतर जातीगायन, “तम्‍भवललाट” ही रचना सादर केली. अष्टपदी-राग वसंत बहार, रागेश्री बंदिश व तराणा, गोंयचे नाव व्हड करुन ही बाकीबाब बोरकर यांची प्रसिध्द रचना नंतर अबिर गुलाल उधळीत रंग हा संत चोखामेळा यांचा प्रसिध्द अभंग, शामतोरी मूरत हे भजन, नाही पुण्याची मोजणी हि अभिषेकीबुवांची अप्रतिम रचना व शेवटी कैवल्याच्या चांदण्याला भूकेला चकोर या रचनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

अवि परवार, वरद तारी, सत्यनारायण कलंगुटकर, मुक्ता मिसर, श्रूती नाईक, राज्ञी फळदेसाई, सदानंद झो. शौनक ओटावणेकर, शिशिर शंखवाळकर, वसंत च्यारी, आश्मी प्रभूदेसाई, वंशीका प्रियोळकर या विद्यार्थ्यांनी गायन तर गौरी शानबाग, कलानागचैत्राली, तिर्था शेटये, अमिषा अडकोणकर, जान्हवी प्रभू म्हांबरे, गौरवी फडके, प्रतिका मराठे, ॲना मारीया श्रृती गावस, उमा नाईक, स्पुर्ती शानबाग, सानवी धुपकर, शिल्पा के, श्रध्दा कुलकर्णी, मंजिरी फुटणकर, नेहाली किनळकर व श्राव्या शेट यांनी कथ्थक व भरतनाटयम् नृत्यरचना सादर केल्या. तबला साथसंगत श्री. सुरज मोरजकर व श्री भार्गवराम गर्दे यांनी केली. श्री. रोहित वनकर बासरी, श्री. शुभम नाईक हार्मोनियम, श्री. दत्तराज सुर्लकर ऑर्गन, कौस्तुभ च्यारी, साईड रीदम्‍ची साथसंगत केली. कार्यक्रमाची संकल्पना श्री. रुपेश गावस यांची होती तर दिग्दर्शन श्री. सचिन तेली, दिग्द.सहाय्य, सौ. सम्राज्ञी आईर, नृत्य दिग्दर्शन सौ. वरदा

बेडेकर, सौ. सपना नाईक, सौ. मंदिरा तिरोडकर यांनी केली. निवेदन श्री. रुपेश गावस, रंगमंच व्यवस्था श्री. रामदास नाईक, जानू चोपडेकर, फकीरप्पा तलवार, देविदास सावंत, सतिश घाडी, प्रकाशयोजना श्री. अंकूश परब, सचिन गावडे, ध्वनिव्यवस्था संयोजन श्री. जयेश सावंत, श्री. सिध्दांत नाईक, श्री. डी. आर. चैतनमुर्ती यांनी सांभाळली. "अमृताभिषेक" कार्यक्रमानंतर कला अकादमीच्या संगीत व नृत्यविभागातून व संगीत केंद्रातून (पेडणे, साखळी, वाळपई, केपे, काणकोण, सांगे) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्री. विनायक खेडेकर यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आली. कला अकादमीच्या माजी विद्यार्थीनी सौ. वंदना बखले (रोहिणी घाटे) पुरस्कृत पं. रत्नकांत रामनाथकर स्मृती पुरस्कार (गायन) श्री. अवि परवार तथा कै. बाळकृष्णा बखले स्मृती पुरस्कार (तबला) श्री. कौशल कवळेकर या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला. औपचारिक कार्यक्रमात. सुरुवातीला स्वागत व प्रस्ताविक संचालक श्री. रुपेश गावस यांनी केले तर अहवालवाचन सौ. सपना नाईक यांनी केले. या प्रसंगी सदस्य सचिव श्री. अरविंद खुटकर यांनी आपले मौलिक विचार प्रगट केले. सुत्रसंचालन सौ. वरदा बेडेकर तर आभार प्रदर्शन श्री. सचिन तेली यांनी केले. सौ. मंदिरा तिरोडकर यांनी प्रशस्तीपत्र प्राप्त विद्यार्थ्यांच्या नावाची घोषणा केली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यास संगीत व नृत्य विभागातील कर्मचारी वर्ग व पालकांनी विशेष सहकार्य केले. पं. शौनक अभिषेकी यांच्याप्रती संगीत व नृत्य विभागातर्फे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)